# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ४३/२०२१

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये (अव्यवसायिक)/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२०—२१

"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"

"लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"

'' राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना''

''महात्मा जोतीराव फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना''

''स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)''

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०—२१ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"**

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विद्यापीठाकडून सदर अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त १० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त ५ विद्यार्थीनीस गुणानुक्रमे रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

- **"लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"**

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून ही अर्थसहाय्य योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त २० व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यास गुणानुक्रमे रू. ३,०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल. (सोबत सविस्तर नियम व अटी)

..२

Solanke
24.2.

24/02/21

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: Univ 228
दिनांक: 24 FEB 2021

**अर्ज करण्याची पद्धत :**

- ➢ वर उल्लेख केलेल्या शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनाकरीता विहित नियम व अटी विचारात घेऊन पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक असून आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत **Upload** करावीत. सोबत अर्ज करण्याची माहितीपुस्तीका जोडत आहोत.
- ➢ विहित केलेल्या नियमानुसार विद्यार्थी दोन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र असल्याने एका पेक्षा जास्त शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावयाचा असल्यास एकाचवेळी अर्जातील योग्य ते दोन पर्याय निवडता येईल.
- ➢ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने सादर केलेले अर्जातील माहिती संबधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी काटेकोरपणे छाननी करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने विद्यापीठास विहित मुदतीत सादर करावी.

**उपरोक्त अर्थसहाय्य योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक:**

- वरील शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी **दि. १०/०३/२०२१** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावा.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून **दि. १२/०३/२०२१** पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.
- विद्यापीठ विभाग/महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे अर्ज (Hard Copy) स्वीकारले जाणार नाहीत.
- महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज तपासुन अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरीत ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे सादर करण्याची प्रक्रिया करावी.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थ्याने दिलेली बॅकेची माहिती अचुक व काळजीपूर्वक भरावी.

या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, अव्यवसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेअंतर्गत विहित नियम व अटी विचारात घेऊन माहिती वर उल्लेख केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx या लिंकवर वरून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत.

**ऑफलाईन (Offline) अर्जाचा शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेसाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

२३/२/२०२१

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/१०६५ )
दिनांक: २३/०२/२०२१ )

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता**

**मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व अव्यवसायिक महाविद्यालय.**

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना"

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पुणे विद्यापीठाने महाविद्यालये/विद्यापीठ विभागामध्ये अव्यवसायिक अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींसाठी "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना" सुरू केलेली आहे.

**नियम व अटी**

१. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त १० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील जास्तीत जास्त ०५ विद्यार्थीनी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

२. पात्र विद्यार्थीनीस रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

३. विद्यार्थीनींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी आणि पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

५. विद्यार्थिनींने मागील लगतच्या परीक्षेत किमान ५० टक्के गुण संपादित केलेले असावेत. ५० टक्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थीनींचा गुणांनुक्रमे विचार करण्यात येईल.

६. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थीनीने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

७. विद्यार्थीनीने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

८. विद्यार्थीनीची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

९. विद्यार्थीनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

१०. विद्यार्थीनीस गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

११. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थीनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

१२. विद्यार्थीनीने त्यांच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

१३. अर्थसहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्यानींची निवड करण्यासाठी महाविद्यालय पातळीवर मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करून अर्जाची छाननी करावी.
   १) मा. प्राचार्य (अध्यक्ष)
   २) महाविद्यालयातील समन्वयक, विद्यार्थी कल्याण योजना
   ३) महाविद्यालयातील विविध शाखांच्या तीन प्राध्यापिका

१४. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यांनीस सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबंधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

२३/११/२०२१

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना''

**नियम व अटी**

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू राहील.
२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतेही अट राहणार नाही केवळ गुणवत्ता हाच निकष राहील.
३. मागील लगतच्या परिक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी किमान ६० टक्के गुण संपादित केलेले असावेत.
४. पात्र विद्यार्थ्यांचे वय पदवी अभ्यासक्रमाकरीता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता ३० पेक्षा जास्त नसावे.
५. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना पुढील निकषानुसार शिष्यवृत्ती योजना लागू राहील.

| | पदवी अभ्यासक्रम | | पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
|---|---|---|---|---|
| | शिष्यवृत्ती रक्कम | विद्यार्थी संख्या | शिष्यवृत्ती रक्कम | विद्यार्थी संख्या |
| कला | ६००० | ४७० | ८००० | ३०० |
| वाणिज्य | ६००० | ४७० | ८००० | ३०० |
| विज्ञान | १०००० | ४७० | १६००० | ३०० |

६. सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विहित केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार देण्यात येणार असून त्यापैकी ४८ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागासवर्ग प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता विचारात घेऊन) व उर्वरित ५२ टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार शिष्यवृत्ती लाभ दिला जाईल.
७. विद्यार्थ्याने व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.
८. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
९. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील यासंदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.
१०. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल.
११. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.
१२. विद्यार्थ्याने त्याच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्र. (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)
१३. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त किंवा प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यताप्राप्त असावेत.
१४. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यांस संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.
१५. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजना लागू राहणार नाही. याबाबत संबंधित विद्यार्थ्याने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

२७/७/२०२१

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

Desktop/ University Scholarship 2020-21/Univeersity Scholarship Circular 2020-21

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## ''स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)''

विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासुन नव्याने सदर योजना सुरू केलेली आहे.

**नियम व अटी**

१. सदर योजना व्यवसायिक व अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार लागू राहील.

२. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या चारही विद्याशाखेतील प्रत्येकी आठ हजार विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार १,०००/— प्रमाणे एकुण ३२,००० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

४. विद्यार्थ्यांची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

५. पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थी म्हणून मा. प्राचार्य/विद्यापीठ विभागप्रमुख यांनी शिफारस करणे आवश्यक राहील.

६. विद्यार्थ्यास या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही.

७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

८. विद्यार्थ्यांने त्यांच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएससी कोड)

९. विद्यार्थ्यांने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

**Displayed on : 26/02/2021** **Notice No.108**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना सन २०२०–२१ (फक्त सिनीयर कॉलेज विद्यार्थ्यासाठी)

## "महात्मा जोतीराव फुले पुणे गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांनी प्रोत्साहन देण्यासाठी ही शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. अव्यवसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ही योजना आहे. अटी,नियम व पात्रता असलेले परिपत्रक क्र. ४३/२०२१ नुसार विद्यापीठ वेबसाईटवर टाकलेले आहे. तरी विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळण्यासाठी दि. **१०/०३/२०२१** पर्यंत ऑनलाईन फॉर्म आवश्यक कागदपत्रासहित भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **अटी, नियम व पात्रता पुढीलप्रमाणे –**
  १. विद्यार्थ्यान मागील परिक्षेत एप्रिल/मे २०२० मध्ये किमान ७०. टक्के गुण संपादित केलेले असावेत.
  २. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने व अगोदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.
  ३. सर्व अव्यवसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.
  ४. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमामधील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु. ६०००/– व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना १०,०००/ तसेच पदव्युत्तर कला व वाणिज्य अभ्यासक्रमासाठी रु. ८०००/– व विज्ञान शाखेसाठी १६०००/– अर्थसहाय्य देण्यात येईल.

५. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २३ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता २५ पेक्षा जास्त नसावे.
६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील.
७. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.
८. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.
९. विद्यार्थ्याने बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे
१०. संपूर्ण विद्यापीठ स्तरावर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त ९०० आणि पदवी अभ्यासक्रमासाठी १४१० विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार आहेत.
११. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थीनिस सदर योजना लागू राहनार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे –**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे २०२० मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.
२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.
३. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
४. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स
५. बॅके खाते आधारकार्डला लिंकिग करणे आवश्यक आहे.
६. सदर योजनेसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता नाही.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College, Baramati**

# Notice

**Notice No.** 109 **Displayed on :** 27 FEB 2021

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना
## (शैक्षणिक वर्ष २०२०—२१ फक्त वरिष्ठ महाविद्यालय)

# "लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्याकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मधील महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणारे विद्यार्थी अर्ज ऑनलाईन भरु शकतात. तरी सदर शिष्यृत्तीचा ज्या विद्यार्थ्यांना लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी दि. १०/०३/२०२१ पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागात खालील वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

**शिष्यवृत्तीचे नियम व अटी—**

१. विद्यार्थ्यांच्या पालकांचे (कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) शै. वर्ष २०१९—२० मधील वार्षिक उत्पन्न रु. २,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे. मा. तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक आहे.

२. एप्रिल/मे २०२० मध्ये झालेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नांत ६५% गुण संपादित केलेले असावेत.

३. पदवी मधील विद्यार्थ्यास सदर शिष्यवृत्ती योजनेचा फायदा तीन वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात घेता येईल व पदव्युत्तर वर्गातील दोन वर्षापैकी फक्त एकाच पदव्युत्तर वर्गात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल ज्या विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नयेत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त २० व अव्यावसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त १० विद्यार्थी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

५. पात्र विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमासाठी रु. ३०००/– व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. ६०००/– असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

६.महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमास किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.

७. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी नसावी.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्याने बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच दिले जाईल.

१२. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा–या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती देण्यात यावी.

१३. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थ्यांस सदर योजना लागू राहनार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन भरलेल्या प्रिंटसोबत जोडावयाची कागदपत्रे–**

१ विद्यार्थ्याच्या पालकाचा वार्षिक उत्पन्न दाखला सन २०१९–२०मधील मा.तहसिलदारांचा असावा.

२. मागील वर्षाची एप्रिल/मे २०२० मार्कलिस्टची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

३. नागरिकत्वाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत. (डोमासाईल झेरॉक्स प्रत.)

४. आधारकार्डच्या झेरॉक्सची साक्षांकित प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत.

६. आधारकार्ड बॅक खात्याशी लिंकिग केलेले असावे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's
# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

**Displayed on : 26/02/2021** **Notice No.110**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना
## "स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना (पुरग्रस्त, दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी)"
## सन २०२०–२१ ( फक्त सिनीयर कॉलेज )

विद्यार्थ्यांना कोणत्या न कोणत्या कारणाने नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी बरेच विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. विद्यार्थ्यांना आर्थिक मदत होईल या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासुन नव्याने सदर योजना सुरु केलेली आहे. **सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १०/०३/२०२१ पर्यंत आहे या दिलेल्या मुदतीतच विद्यार्थ्यांनी अर्ज करावा.**

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

•नियम व अटी पुढीलप्रमाणे –

१. सदर योजना व्यवसायिक व अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार लागू राहील.

२. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या चारही विद्याशाखेतील प्रत्येक आठ हजार विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार १,०००/– प्रमाणे एकूण ३२००० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

३. महाविद्यालये / विद्यापीठे शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्यांने नियमीत अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा

४. विद्यार्थ्यांची नियमीत अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असने आवश्यक आहे. यासंदर्भात प्राचार्यानी दाखला देणे आवश्यक राहील.

५. पुरग्रस्त दुष्काळग्रस्त व आपत्तीग्रस्त भागातील विद्यार्थी म्हणून मा. प्राचार्य / विद्यापीठ विभागप्रमुख यांनी शिफारस करणे आवश्यक राहील.

६. विद्यार्थ्यास या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी स्विकारता येणार नाही
७. विद्यार्थ्यांस गैरशिस्त/ नैतिकता/ परीक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षाझ्झालेली नसावी.
८. विद्यार्थ्यांने त्यांच्या बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बॅकेचे नाव, पत्ता खाते क्रमांक (एम.आय.सी.आर आणि आय. एफ.एस.सी कोड)
९. विद्यार्थ्यांचे आणि संबधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 111 Displayed on 27 FEB 2021

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना (फक्त वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनीसाठी)

## "क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"

## शिष्यवृत्ती सन २०२०–२१

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विद्यार्थिनीकरिता क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरमध्ये शिकणा–या विद्यार्थिनी अर्ज ऑनलाईन भरावयाचे आहेत. तरी सदर शिष्यवृत्ती ज्या विद्यार्थिनींना लाभ घ्यावयाचा आहे. त्यांनी दि. १०/०३/२०२१ पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरुन प्रिंट आवश्यक कागदपत्रांसहीत महाविद्यालयात सादर करावी. सदरचे फॉर्म खालील वेबसाईटवर ऑनलाईन भरावेत.

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

## शिष्यवृत्तीचे नियम व अटी–

१. विद्यार्थिनी एप्रिल/मे २०२० मध्ये झालेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नांत ५०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी.

२. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थिनीस संपूर्ण पदवीच्या तीन वर्षात एकदाच दिला जात असल्याने या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेल्या विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नये. तसेच पदव्युत्तर वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनीने सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल, अशा विद्यार्थिनीने पुन्हा अर्ज करु नये.

३. महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील अव्यवसायिक पदवी अभ्याक्रमास शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त १० व अव्यवसायिक पदव्युत्तर अभ्याक्रमातील जास्तीत जास्त ०५ विद्यार्थिनी सदर योजनेसाठी पात्र राहतील.

४. विद्यार्थिनींच्या पालकांचे उत्पन्न सन २०१९—२० मध्ये रु. २,५०,०००/— पेक्षा च्या जास्त नसावे. यासाठी मा. तहसिलदार यांचा दाखला आवश्यक राहील.

५. विद्यार्थिनींनी व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

६. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग. उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

७. सदर शिष्यवृत्तीची रक्कम रु. ५०००/— इतकी आहे.

८. विद्यार्थिनीस गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेत गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थिनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी अथवा शिष्यवृत्ती स्विकारता येणार नाही.

१० सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थिनीस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

११. विद्यार्थिनीने तिच्या बॅक खात्याची (राष्ट्रीयकृत) संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

१२. विद्यार्थिनींची नियीमत अभ्यासक्रमास किमान ७५% उपस्थिती असणे आवश्यक आहे.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्याचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थीनिस सदर योजना लागू राहनार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन फॉर्म सोबत जोडावयाची कागदपत्रे —**

१. एप्रिल/मे — २०२० ची गुणपत्रिकेची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
२. शैक्षणिक वर्ष २०१९—२० मधील मा. तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला.
३. रहिवाशी दाखला/आधारकार्डाची झेरॉक्स साक्षांकित झेरॉक्स प्रत.
४. बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत
५. बॅक खाते आधारकार्ड आधार लिंकिग केलेले असावे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

Anekant Education Society's
## Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : 27 FEB 2021 Notice No. 112

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शिष्यवृत्ती योजना

(शै. वर्ष २०२०–२१ वरिष्ठ महाविद्यालयातील फक्त जात संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी )

## "राजर्षी छत्रपति शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"

मागासवर्गीय घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत सदर शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केलेली आहे. सदर योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी लागू असून पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज (सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील एकत्रित) गुणवत्तेनुसार विचारात घेतले जातील त्यापैकी ४८ टक्के मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा एकत्रित गुणवत्तेनुसार व उर्वरित ५२ टक्के विद्यार्थ्यांचा त्या त्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार गुणानुक्रमे अर्ज विचारात घेतले जातील. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील योजनेस पात्र विद्यार्थ्यांना पुढील निकषानुसार शिष्यवृत्ती योजना लागू राहील. **सदर योजनेसाठी ऑनलाईन फॉर्म भरणेची मुदत १०/०३/२०२१ पर्यंत खालील वेबसाईटवर भरावेत.**

**http://bcud.unipune.ac.in/Scholorships/Applicant/Login.aspx**

- **नियम, अटी व पात्रता पुढीलप्रमाणे –**

१. सदरची योजना फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाच लागू होणार आहे.

२. सदरच्या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट राहणार नाही. केवळ गुणवत्ता हा निकष राहील.

३. विद्यार्थ्याने मागील परीक्षेत एप्रिल/मे २०२० किमान ६०% गुण मिळविलेले असावेत.

४. शिष्यवृत्ती योजनेचा फायदा विद्यार्थ्यांस संपूर्ण पदवी व पदव्युत्तर काळात एकदाच दिला जात असल्याने पदवी वर्ग व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज भरु नयेत.

५. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

६. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील

७. पात्र विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ६०००/— व विज्ञान शाखेसाठी १०,०००/— पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु ८०००/— व विज्ञान शाखेसाठी १६,०००/— असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

८. सर्व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जाईल.

९. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परिक्षेतील गैरप्रकार इ.बाबत शिक्षा झालेली नसावी.

१०. विद्यार्थ्याने बॅक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

११. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१२. पात्र विद्यार्थ्याचे वय पदवी अभ्यासक्रमाकरिता २५ व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३० पेक्षा जास्त नसावे.

१३. शासनाकडून व विद्यापीठाकडून देण्यात येणा—या विविध शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर आधारकार्ड क्रमांक आपल्या बॅक खात्याशी संलग्न असणेही आवश्यक असल्याने त्याची माहिती बॅकेस देण्यात यावी.

१४. संपूर्ण विद्यापीठ स्तरावर सदर शिष्यवृत्तीचा पदवी वर्गासाठी एकूण १४१० व पदव्युत्तर वर्गासाठी एकूण ९०० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ मिळणार असून ४८ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार (मागास वर्ग विद्यार्थ्यांची एकत्रित गुणवत्ता) विचारात घेऊन व उर्वरित ५२ टक्के गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या त्या प्रवर्गासाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारनुसार शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाईन.

१५. शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत असलेल्या विद्यार्थीनिस सदर योजना लागू राहनार नाही. याबाबत संबधित विद्यार्थीनीने आणि प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करावयाची कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याच्या मागील वर्षाची एप्रिल/मे— २०२० मार्कलिस्टची स्वंयसाक्षांकित झेरॉक्स प्रत.

२. आधारकार्डच्या झेरॉक्सची स्वंयसाक्षांकित प्रत.

३. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

५. राष्ट्रीयकृत बॅकेच्या बचत खातेच्या पासबुकची झेरॉक्स

६. फॉर्मसोबत आधारकार्ड लिंकिग सिडींग स्लीप जोडणे आवश्यक आहे.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2020-21\University Scholarship Notice 2020-21.docx